'साप्ताहिक शब्दरुतू'चे वार्षिक वर्गणीदार होण्यसाठी क्यूआर कोडवर वार्षिक किंवा मासिक योजनांचे पेमेंट करून मो. ९०११२०१४१४ या व्हाट्सअॅप नंबरवर स्क्रिनशॉट व आपला पूर्ण पत्ता पाठवावा.

**वार्षिक वर्गणी : १८० । मासिक वर्गणी : १४**

# शब्दरुतू

पोस्टल परवाना नं. SRP/136/2023-2026 संपर्क : मो. ९०११२०१४१४

**कार्यकारी संपादक : सुमीत लांडे, मुंबई** Email ID : shabdarutu@gmail.com

✻ वर्ष २ रे ✻ अंक ४२ वा ✻ रविवार दि. २० जुलै २०२५ (Decl.Regd.No. SR/MAG/11/2021) RNI.NO.MAHMAR/2021/84232 पाने ४ ✻ किंमत ४ रु. साप्ताहिक (Weekly)


## हिंदी भाषेचा वाद सर्वोच्च न्यायालयात

**मुंबई :** राज्यातील मराठी आणि हिंदी भाषेचा वाद आता सर्वोच्च न्यायालयात पोहोचला आहे. हिंदी सक्तीविरोधात आक्रमक विधानं केल्याने राज ठाकरे यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. राज ठाकरेंविरोधात सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. वकील घनश्याम उपाध्याय यांनी ही जनहित याचिका दाखल केली आहे. भाषेवर आधारित द्वेष पसरवल्याबद्दल मनसे प्रमुख ठाकरे यांच्याविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे.

# विधानसभेत गोंधळ : टकले, देशमुख यांच्यावर फौजदारी

## पडळकर, आव्हाडांना खेद व्यक्त करण्याची विधानसभा अध्यक्षांची सूचना

**मुंबई:** आमदार गोपीचंद पडळकर अणि आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या समर्थकांमधील वादावर अखेर विधानसभा अध्यक्षांनी कारवाईला सुरुवात केली आहे. विधिमंडळ सभागृह सुरक्षा समितीच्या अहवालानंतर अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दोन्ही आमदारांनी खेद व्यक्त करावा, अशा सूचनाही केल्या आहेत. आमदार पडळकर आणि आमदार आव्हाड यांच्याशी संबंधित सर्जेराव चधन टकले (वय ३७) आणि नितीन हिंदुराव देशमुख (वय ४१) यांच्यावर फौजदारी करण्यात येत असल्याचे नावेकर यांनी सांगितले. त्यांच्याविरुद्ध चौकशी करून विशेषाधिकार भंगाची कारवाई करण्यासाठी विधानसभा विशेषाधिकार समितीकडे दोघांचे प्रकरण वर्ग करत आहे, असेही विधानसभा अध्यक्षांनी म्हटले.

१७ जुलैले २०२५ रोजी सभागृहात अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा सुरु असताना काही सन्माननीय सदस्यांनी माझ्या निदर्शनास आणले आहे की, विधानभवन इमारतीच्या प्रवेशद्वाराबार मेन पोर्च येथे दोन अभ्यागतांमध्ये भारामारी झाली आहे. याबाबत विविध प्रसारमाध्यमांवर बातम्या प्रमिद्ध करण्यात आल्या. विधानमंडळाचे सदस्य यांच्याबाबत टीकाटिप्पणी करण्यात आली आहे. ही बाब गंभीर स्वरुपाची असून सभागृहाच्या प्रसिमेमध्ये पडली आहे. याचाबत मी विधिमंडळाचे मुख्य सुरक्षा अधिकारी यांना तात्काळ या घटनेचा अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. या अहवालातून दिसून येते की, १७ जुलै रोजी संध्याकाळी ५ वाजून ४५ मिनिटांनी मेन पोर्चमध्ये अचानक दोन अभ्यागतांमध्ये मारामारी सुरु झाली. ही मारामारी सुरक्षा पथकाने तात्काळ थांबवली. नमूद इसमांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यापैकी नितीन हिंदुराव देशमुख (वय ४१) याने जितेंद्र आव्हाडांचा कार्यकर्ता असल्याचे सांगितले. तर दुसरा इसम सर्जेराव बबन टकले (वय ३७) **(पान २ वर)**



### सरकारी कामात अडथळा; आव्हाडांवर गुन्हा

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जितेंद्र आव्हाड यांचे कार्यकर्ते नितीन देशमुख यांना काल पोलिसांनी ताब्यात घेतलं होतं. नितीन देशमुख यांना विधानभवनातून बाहेर घेऊन जात असताना जितेंद्र आव्हाड यांनी पोलिसांची गाडी अडवण्याचा प्रयत्न केला होता. सरकारी कामात अडथळा आणल्यामुळं जितेंद्र आव्हाड यांच्या विरोधात मुंबई पोलिसांनी मरिन ड्राइव्ह पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची परवानगी घेऊन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### माझा काहीही संबंध नाही : आव्हाड

“नितीन देशमुखला पास देण्यासाठी मी कुठलीही शिफारस केली नाही, मी त्याला विधिमंडळात आणलं नाही. मी माझ्या पीए शिवाय कधीच कुणाला सभागृहात आणत नाही. विशेष म्हणजे जेव्हा ही घटना घडली, तेव्हा मी विधिमंडळ परिसरात देखील नव्हतो. याउलट मी मरीन ड्राईव्ह परिसरात होतो. त्यामुळे, या घटनेशी माझा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष काहीही संबंध नाही, असे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी बावेळी म्हटले.


### 'हे आमदार माजले आहेत': मुख्यमंत्री

“आमदार पडळकर आणि जितेंद्र आव्हाड यांनी खेद व्यक्त करताना, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही सभागृहात भूमिका मांडली. जितेंद्र आव्हाड यांच्याकडून होत असलेल्या स्पष्टीकरणावर बोलताना कुठेतरी आपण राजकारणापलिकडे जाऊन विचार करायला हवा, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटलं. ही प्रतिष्ठा एका व्यक्तीची नसून सगळ्या आमदारांची प्रतिष्ठा बाहेर पडली आहे. शिव्या दिल्या जात आहेत, हे सगळे आमदार माजले म्हणून बाहेर बोललं जात आहे, असे म्हणत कुणाचंही इथं समर्थन करणं योग्य नाही, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटलं.

# पावसाळी अधिवेशनाचा समारोप 'जनसुरक्षा'सह १६ विधेयके पास

## पावसाप्रमाणे सरकारचीही दमदार कामगिरी : फडणवीस

**मुंबई :** पावसाळी अधिवेशनाचा समारोप झाला आहे. अधिवेशनात १६ विधेयके आम्ही पास केली असल्याचे वक्तव्य राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. राज्यात सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडत आहे. ९३ टक्के पाऊस आतापर्यंत पडला आहे. धरणात चांगला



साठा आहे. खरिपाचा हंगाम यंदा चांगला असेल. पावसाची कामगिरी दमदार आहे तशीच आमच्या सरकारची देखील दमदार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. महाराष्ट्रातील ११ किल्ले आणि तामिळनाडूतील जिंजी अशा १२ किल्ल्यांचा जागतिक वारसा यादीत समावेश करण्यात आला आहे. सरासरीपेक्षा अधिक पाऊस आता पडत आहे. **(पान २ वर)**

## गणेशोत्सवासाठी २५० विशेष ट्रेन

**मुंबई :** २७ ऑगस्ट रोजी गणेशोत्सवाला सुरुवात होणार आहे. या निमित्ताने कोकणवासीयांची गावी जाण्यासाठी लगबग सुरु आहे. कोकणातील चाकरमानी या दिवसांमध्ये गावी जाण्यासाठी काय पर्याय निवडता येईल असा विचार करतात. याच दरम्यान चिपळूणवासीयांसाठी प्रशासनाने आनंदाची बातमी दिली आहे. चाकरमान्यांच्या सोयीसाठी विशेष ट्रेन सोडण्यात येणार आहे.

# विधिमंडळात कार्यकर्त्यांना प्रवेश बंदी

**मुंबई :** मारहाणीच्या राड्यानंतर अधिवेशन काळात विधिमंडळात कोणत्याही पक्षाच्या कार्यकर्त्यांना प्रवेश बंद करण्यात येणार आहे. अशी सभागृह अध्यक्ष नार्वे कर यांनी घोषणा केली. भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या समर्थकांमध्ये काल विधानभवनात राडा झाला. या घटनेने महाराष्ट्राची मान शरमेने खाली गेली. या मारहाणीचे



तीव्र पडसाद उमटले. या प्रकरणाचं गांभीर्य लक्षात घेत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

विधिमंडळात येण्यासाठी चक्क ५-१० हजार रुपयांना पास विकले जात असल्याचा धक्कादायक आरोप आ. शशिकांत शिंदे आणि आ. अनिल परब यांनी केला आहे. मुंबईतील आयनॉक्स थेअटर जवळ ५ हजार आणि १० हजार रुपये देऊन पास विकले जात आहेत. कुणाला पैसे द्यायचे, कुठे द्यायचे, पहिल्या गेटवर किती द्यायचे, आतल्या गेटवर किती पैसे द्यायचे हे ठरलेले आहे. आम्ही दुपारपर्यंत तुम्हाला एफिडेव्हीटवर नावे लिहून देतो, अशी धक्कादायक माहिती आमदार - अनिल परब यांनी केला.

# दिनो मोरियाने तोंड उघडलं तर अनेकांचा मोरया होईल

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा ठाकरेंवर निशाणा



**मुंबई :** मिठी नदीततला गाळ कोण काढतोय, यांना गाळ काढायला मराठी माणूस नाही दिसला, तर दिनो मोरिया दिसला. तिथ यांना मोरे दिसला नाही. पण, दिनो मोरियाने तोंड उघडलं तर अनेकांचा मोरया होणार, असे म्हणत एकनाथ शिंदेंनी एकप्रकारे ठाकरेंना इशाराच दिला. कोविडमध्ये खिचडी चोरणारे, डेडबॉडी चोरणारे आमच्यावर आरोप करत आहेत. कुणावर भ्रष्टाचाराचे आरोप करताय?, असे सवाल करत एकनाथ शिंदेंनी सभागृहातून नाव न घेता थेट ठाकरे गटावर निशाणा साधला.


राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज पुन्हा **(पान २ वर)**

# ज्येष्ठ लेखक पठारे सर यांच्या पंच्याहत्तरीनिमित्त विविध कार्यक्रम

**श्रीरामपूर :** ज्येष्ठ लेखक रंगनाथ पठारे सर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध ठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सरांच्या वाढदिवसानिमित्त निरगुडे येथे डिजिटल शाळा साकार होत आहे, पारनेर तालुक्यातील म्हस्केवाडी येथे ७५ वृक्षरोपांचे रोपण करण्यात येणार आहे.

पारनेर तालुक्यातील म्हस्केवाडी येथे सह्याद्री देवराईच्या सातव्या वर्धापन दिनानिमित्त 'मियावाकी' प्रकल्पाचा भव्य शुभारंभ शनिवार, दि. १९ जुलै रोजी सकाळी ९ वाजता होणार आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ साहित्यिक डॉ. भालचंद्र नेमाडे यांच्या हस्ते होणार आहे.

विशेष अतिथी म्हणून ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ पठारे, सुप्रसिद्ध साहित्यिक राजन गवस, सह्याद्री देवराईचे प्रणेते व सुप्रसिद्ध अभिनेते सयाजी शिंदे, खासदार नीलेश लंके, आमदार काशीनाथ दाते, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद



भंडारी हे उपस्थित राहणार आहेत. या वृक्षारोपण सोहळ्यात, ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ पठारे यांच्या अमृत महोत्सवानिमित्त ७५ वृक्षरोपांचे रोपण करण्यात येणार आहे.

कार्यक्रमास भाजप राज्य परिषद सदस्य विश्वनाथ कोरडे, साहित्यिक अरविंद जगताप, भूमिअभिलेख उप- ाधीक्षक माधवराव पाटील, संदीप वराळ फाउंडेशनचे अध्यक्ष सचिन वराळ पाटील, अष्टचक्र शक्तीपीठ ट्रस्टचे संस्थापक गुरुवर्य सागर बाबा ऋषी, कृषी अधिकारी कदम साहेब, शिवसेना (उबाठा) उपजिल्हाप्रमुख डॉ. भास्कर शिरोळे, वनस्पती तज्ज्ञ सुहास वायंगणकर, गटविकास अधिकारी दयानंद पवार, तालुकाप्रमख डॉ. श्रीकांत पठारे, **(पान २ वर)**



# प्लॅस्टिक फुलांवर येणार बंदी!

## १०५ आमदारांच्या सह्यांचे पत्र; मुख्यमंत्र्यांची संमती

**मुंबई :** सणासुदीला, विविध उत्सवात सजावटीसाठी बाजारात येणाऱ्या प्लॅस्टिक फुलांमुळे शेतकऱ्यांचं मोठं नुकसान होत आहे. त्यामुळे, कृत्रिम फुले बंद व्हावीत व फुल उत्पादक शेतकऱ्यांना योग्य भाव मिळावा यासाठी मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीमध्ये बैठक लावून तातडीने निर्णय घ्यावा अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तासगाव कवठेमहांकाळचे आमदार रोहित पाटील यांनी निवेदनाद्वारे केली.

शासन कृत्रिम फुलांवर बंदी आणेल, आम्ही सीएमसोबत मिटींग असून त्यात हे ठरले आहे. कृत्रिम फुलांमुळे शेतकरी वर्गाला फटका बसतो पण त्याचवेळी रासायनिक कलर वापरणेही यामुळे थांबेल, असे भरत गोगावले यांनी सांगितले आहे. आमदार महेश शिंदे यांनी सभागृहात लक्षवेधी उपस्थित करत हा मुद्दा चर्चेला आणला होता. त्यावर, हा निर्णय घेण्यात आला आहे.

उत्पादक शेतकऱ्यांसाठी हा विषय महत्त्वाचा असल्याचे आमदार रोहित पवार यांनी म्हटले. याबाबत मुख्यमंत्र्यांनी लवकरच फलोत्पादन मंत्री भरत गोगावले व पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत बैठकीचे आयोजन करण्याचे आश्वासन दिले आहे. विशेष म्हणजे मंत्री गोगबले यांनी देखील शासन कृत्रिम फुलांवर बंदी आणेल, असे म्हटले आहे.

आ. रोहित पाटील यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राज्यात सर्रासपणे प्लॅस्टिक फुलांचा वापर प्रचंड प्रमाणात झाला आहे. त्यामुळे शेतीतील विविध प्रकारच्या फुलांची लागवड करून सदरची फुले बाजारात प्लॅस्टिकच्या फुलांमुळे अत्यल्प दरात विक्री होत असल्याने शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे. प्लॅस्टिक पिशवी वापरावर ज्याप्रमाणे शासनाने बंदी आणली त्याप्रमाणे या प्लॅस्टिकच्या फुलांवर कायमस्वरूपी निबंध घातल्यास त्याचा शेतकरी वर्गास मोठा फायदा होणार आहे. द्राक्षपिक व इतर फळपिकांना पर्यायी व्यापारी पिक म्हणून फुलशेती केली जाते. या फुलशेतीसाठी लागणारी औषधे, मजुरी व ट्रान्सपोर्ट खर्च पाहता शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्यामुळे **(पान २ वर)**


# कुंभमेळ्यापूर्वी शिर्डी विमानतळाची प्रस्तावित कामे पूर्ण करावी

### मुख्यमंत्री फडणवीस यांचे निर्देश

**शिर्डी :** आगामी काळात होणाऱ्या नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्याच्या दृष्टीने शिर्डी विमानतळ हे महत्त्वाचे विमानतळ असणार आहे. त्यामुळे हे विमानतळ पूर्ण क्षमतेने सुरू करण्यासाठी नूतनीकरण व विस्तारीकरणाची कामे तातडीने पूर्ण करावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

शिर्डी विमानतळाच्या कामाचा आढावा काल फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील विधानभवनातील बैठकीत घेण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी वेलरासू, पुणे विभागीय **(पान २ वर)**


### नवी कोरी पुस्तकं




**भवतालची माणसं**
: लेखकाचे नाव :
**सतीश कामत**
किंमत रु. : २६०/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन**




**किशोरांचे वय वाढताना**
: लेखकाचे नाव :
**डॉ. राजेंद्र मलोसे**
किंमत रु. : १६०/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन**


### संक्षिप्त

## हगवणे प्रकरणामध्ये पोलिसांवर ताशेरे

**मुंबई ।** हगवणे कुटुंबाच्या रानटी अत्याचाराला कंटाळून आत्महत्या केलेल्या वैष्णवी हगवणे प्रकरणामध्ये अनेक त्रुटी असल्याचं विधिमंडळाच्या महिला, बालकांच्या हक्क आणि कल्याण समितीच्या अहवालांमधून समोर आलं आहे. या समितीने पोलिसांच्या भूमिकेवर कडक ताशेरे ओढताना जालिंदर सुपेकर यांची सखोल चौकशी करून त्यांना सहआरोपी करण्याची आवश्यकता असल्याचे म्हटले आहे. या अहवालाचा तपशील समोर आला असून यामध्ये जालिंदर सुपेकर यांच्या पत्नीच्या खात्यावर रुखवताच्या नावाखाली तब्बल दीड लाख रुपये ट्रान्सफर झाल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.

# दुष्काळमुक्तीसाठी जलसिंचन क्षमता वाढविणार

## जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची विधानपरिषदेत माहिती

**प्रवरानगर :** महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागांमध्ये जलसिंचनाची क्षमता वाढवण्यासाठी शासन गंभीर असून, त्यासाठी महत्त्वाची पावले उचलण्यात येत आहेत, असे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विधानपरिषदेत स्पष्ट केले. सदस्य रणजितसिंह मोहिते यांनी अर्धा तास चर्चेत वाढत्या पाण्याची मागणी पूर्ण करण्याची सूचना केली होती. त्यावेळी मंत्री विखे यांनी माहिती दिली.

मंत्री विखे म्हणाले की, कृष्णा मराठवाडा प्रकल्पासाठी अंदाजे २१ टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. यासाठी ११५ टीएमसी पाण्याच्या फेरजल निर्णय घेण्यात नियोजनाचा आला आहे. यासोबतच, उजनी धरणातून २३.७ टीएमसी पाणी धाराशिव जिल्ह्यात वळवले जाणार आहे. या भागातील काही तालुक्यांमध्ये उपसा सिंचनाद्वारे पाणीपुरवठा केला जाईल. या प्रकल्पासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने महाराष्ट्र रेसिलियन्स मंत्री विखे-पाटील यांची विधानपरिषदेत माहिती सांगितले. डेव्हलपमेंट



प्रोग्राम राबवण्यात येत आहे. फ्लड डायव्हर्जन ही यामधील मुख्य योजना असून, १३ मार्च २०२४ रोजी त्याला मान्यता देण्यात आली आहे. दोन महिन्यांच्या कालावधीत पपराच्या पाण्याचा उपयुक्त वापर होईल, असे त्यांनी प्रकल्पाचा सर्वेक्षण अहवाल लवकरच अपेक्षित असून, पुढील पावसाळ्यापूर्वी हे काम पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. कृष्णा खोऱ्यातून भीमा खोऱ्यात सुमारे ५५ टीएमसी पाणी आणण्याचा प्राथमिक अंदाज आहे.

सब्व्हेक्षण झाल्यानंतर वस्तुस्थिती सादर करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले या महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधांच्या प्रकल्पावर सुमारे ४००० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. परंतु जागतिक बँकेच्या निधीमुळे आता अडथळा उरलेला नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. यावर्षी प्रकल्पाच्या निविदा निघतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तसेच उजनी, जायकवाडी, धरणांमधील गाळ काढण्याचे धोरण तयार करण्यात येत आहे. लवकरच मंत्रिमंडळासमोर येणार असून, मान्यता शासनाचा प्रयत्न आहे. उज २४-२५ टीएमसी पाणी होते. सोलापूर महापालिकेस पाईपलाईन उपलब्ध झाल नदीपात्रात पाण्याचा प्रवा त्यामुळे नदीकाठच्या शेल जलसिंचन अडचणीत येऊ भीमा नदीवर ११ नवी प्रस्तावित करण्यात आले त्यांनी यावेळी सांगितले.

# संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष गायकवाड यांना काळे फासले!

## शिवधर्म फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांकडून मारहाण

**सोलापूर :** अक्कलकोट येथे संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांना काळ फासण्यात आलं आहे. प्रवीण गायकवाड हे अक्कलकोट येथे फत्तेसिंह शिक्षण संस्था आणि सकल मराठा समाजाच्या कार्यक्रमासाठी आले होते. यावेळी ही घटना घडली. छत्रपती शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख केल्याच्या रागातून शिवधर्म फाऊंडेशनच्या कार्यकर्त्यांनी काळ फासले. त्यानंतर प्रवीण गायकवाड हे कारमध्ये जाऊन बसले. पण शिवधर्म फाऊंडेशनचे कार्यकर्ते आक्रमक झाले होते. त्यांनी



कारमध्ये घुसून गायकवाड यांना मारहाण केली. त्यानंतर रस्त्यावरही त्यांना मारहाण झाल्याचे समोर आले.

मिळालेल्या माहितीनुसार प्रवीण गायकवाड हे अक्कलकोट दौऱ्यावर होते. यावेळी ते फत्तेसिंह शिक्षण संस्था आणि सकल मराठा समाजाने आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात आले होते. तिथे येताच काही लोक अचानकपणे त्यांच्याकडे आले आणि जमा होत त्यांनी प्रवीण गायकवाड यांना काळ फासलं.

# शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट

**पुणे :** राज्यातील बहुतांश भागात गेल्या महिनाभरापासून पावसाने दडी मारली आहे, त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. जिल्ह्यातील काही भागात मुगाच्या प्रारंभी थोड्याफार प्रमाणात पाऊस झाला. या पावसाच्या भरवश्यावर अनेक शेतकऱ्यांनी पेरण्या उरकल्या. मात्र, त्यानंतर अद्याप पाऊस झालेला नाही. सध्या तर उन्हाचा चटका वाढला आहे. त्यामुळे शेतकरी चिंतेत आहेत. सध्या पिकांना पाण्याची नितांत गरज आहे. पाऊस नसल्याने अनेक भागात पिके कोमेजून जात आहेत तर काही भागात कोवळ्या पिकांनी



माना टाकल्या आहेत.

सध्या सोयाबीनच्या पिकाला पाण्याची नितांत गरज आहे. पुढील आठ दिवसात पाऊस झाला नाही तर लातूर जिल्ह्यातील साडेचार लाख हेक्टरवरील सोयाबीनचे पीक धोक्यात येण्याची शक्यता आहे. म्हणजेच पर्यायाने शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढावण्याची भीती आहे. एका एकर सोयाबीन लागवडीसाठी शेतकऱ्यांना दहा ते बारा हजार रुपये खर्च करावा लागतो. दुबार पेरणी करायची झाल्यास तेवढाच खर्च पु करण्याची वेळ शेतकऱ्यावर येणार आहे.

हवामान विभागाने सर्व दूर पावसाचा इशारा दिला असला त मराठवाड्यात परभणी वगळता उर्वरित भागात गेल्या दहा-बा दिवसांपासून पावसाचा खंड आहे काही भागात पावसाच् हलक्या सरी होत्या. बहुतांश ठिकाणी ढगाळ वातावरण आ मात्र पावसाचा पत्ता नसल्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढल आहे.

## दुर्गम जंगलात रशियन महिलेचे ८ वर्षांपासून बेकायदेशी वास्तव्य

**बंगळुरू :** कर्नाटकच्या उत्तर कन्नडा जिल्ह्यात गोकर्ना जवळच्या कुमटा तालुक्यातील रामतीर्थ टेकड्यांमधील एका गुहेतून एका दुर्गम भागात एक रशियन महिला गेल्या ८ वर्षांपासून बेकायदेशीरपणे राहत असल्याची बाब आढळून आली आहे. विशेष म्हणजे ही महिला तिच्या दोन मुलींसह एका गुहेत राहत होती. हा प्रकार उजेडात आल्यानंतर या महिलेची सर्वत्र चर्चा होत आहे. नीना कुटीना असं या महिलेचं नाव असून आता तिला तिच्या देशात परत पाठवलं जाणार आहे.

# साखर कामगारांना मिळणार १० टक्के वेतनवाढ!

**पुणे :** राज्यातील साखर कारखाना कामगारांच्या वेतनवाढीबाचत त्रिपक्षीय समितीच्या माध्यमातून मार्ग करताना ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी मांडलेला १० टक्के पगार वाढीचा निर्णय साखर कामगार संघटनांचे प्रतिनिधी, साखर कारखान्यांचे मालक प्रतिनिधी आणि शासन प्रतिनिधी यांनी मान्य केला.

त्यामुळे राज्यातील सर्व साखर कारखाना कामगारांना १० टक्के पगारवाढ देण्यात येणार आहे. हा करार २०२४ ते २०२९ या कालावधीसाठी असणार आहे.

साखर कारखाना



कामगारांबाबत वेतनवाढीचा पाच वर्षाच्या कराराचा कालावधी ३१ मार्च २०२४ रोजी संपला होता. नविन करारासाठी शासनामार्फत त्रिपक्ष समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीच्या एकूण चार बैठका झाल्या.

कामगार संघटनांनी १८ टक्के वेतनवाढीची मागणी केली होती. तर साखर कारखान्यांनी वेतनवाढ रास्त असावी, अशी आग्रही भूमिका घेतली होती. गेल्या ४० वर्षांपासून साखर कारखाना कामगार आणि साखर कारखाने व्यवस्थापन प्रतिनिधी खासदार शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली समन्वयाच्या तोडग्यानुसार निर्णयाप्रत येण्याची परंपरा पाळीत आहेत. साखर कारखाना कामगार प्रतिनिधी आणि साखर कारखाना मालक प्रतिनिधी, शासन प्रतिनिधी यांची बैठक आज १४ जुलै रोजी झाली. या बैठकीत तोडगा काढण्याचा प्रयत्न झाला. साखर उद्योगाची परिस्थिती, कारखान्यांची स्थिती, कामगारांची आवश्यकता या सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन शरद पवार यांनी १० टक्के वेतनवाढीचा प्रस्ताव ठेवला. त्याला दोन्ही पक्षांनी मान्यता दिली. महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघाच्या वतीने ही घोषणा करण्यात आली.

पान १ वरून

## विधानसभेत गोंधळ : टकले, देशमुख यांच्यावर फौजदारी

याने गोपीचंद पडळकरांचा यांचा मावसभाऊ असल्याचे सांगितले. याबाबत संबंधितांविरोधात आणि त्यांच्यासोबतच्या सहा ते सात जणांविरोधात मरिन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांच्यावर फौजदारी कारवाई करण्यात येत आहे. कोणत्याही प्रकारची परवानगी नसताना व अधिकृत प्रवेशिका नसताना अनधिकृतपणे हे अभ्यागत विधानभवनाच्या आवारात आले. त्यांनी मारामारी करुन आक्षेपार्ह कृत्य केल्याच दिसून येते. विधानमंडळाच्या प्रसिमेममध्ये अशी घटना यापूर्वी कधीही झालेली नाही. सदस्यांनी विधानमंडळात येताना कोणत्याही अनाहूत व्यक्ती व अभ्यंगत यांना विधिमंडळाच्या परिसरात आणण्याची कोणतीही आवश्यकता आहे, असे मला वाटत नाही. तसेच अभ्यांगत कोणत्याही कारणामुळे विधानभवनात आले तर त्यांच्या वर्तणुकीची जबाबदारी संबंधित सदस्याने घेणे आवश्यक आहे. कोणत्याही अभ्यांगताच्या आक्षेपार्ह वर्तणुकीसाठी सदस्यांवर जबाबदारी निश्चित करणे गरजेचे आहे. या अप्रिय घटनेच्या अनुषंगाने मी सर्व सदस्यांच्या निदर्शनास आणत आहे की, विधिमंडळाचे सदस्य म्हणून आपले कर्तव्य पार पडत असताना आपणावर विधिमंडळाच्या सर्वोच्च परंपरा राखण्याचे उत्तरदायित्त्व आणि जबाबदारी आहे. विधिमंडळाला लोकशाहीचे मंदिर संबोधले जाते. त्यामुळे. दोन्ही सदस्यांनी सभागृहात खेद व्यक्त कराव्या, अशा सूचनाही अध्यक्षांनी केल्या होत्या. गोपीचंद पडळकर आणि जितेंद्र आव्हाड यांनी या दोघांना सभागृहात आणल्याबद्दल सभागृहात खेद व्यक्त करावा, तसेच, भविष्यात अशा घटना घडणार नाहीत याची दखल घ्यावी, अशा सूचनाही विधानसभा अध्यक्षांनी दिल्या आहेत. दरम्यान, विधानसभा अध्यक्षांच्या सूचनेनंतर आमदार गोपीचंद पडळकर आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांनी सभागृहात खेद बाळगत करत दिलगिरी व्यक्त केली आहे.

## पावसाळी अधिवेशनाचा समारोप 'जनसुरक्षा'सह १६ विधेयके पास

९३ टक्के पाऊस आतापर्यंत पडला आहे. पंचनामे करण्याचे आदेश दिलेत, काही भागात पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. नुकसान झालेल्यांना पैसे वाटप करतोय. धरणात चांगला साठा आहे. खरिपाचा हंगाम यंदा चांगला असेल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

एससीएसटी समाजाच्या आयोगांना वैधानिक दर्जा दिला आहे. जनसुरक्षा विधेयक यासंदर्भात अनेक अफवा पसरवण्यात आल्या आहेत. सगळ्या बैठका समितीच्या खेळीमेळीत पार पडल्या. ज्या सुराधणा सुचवल्या त्याच क्षणी त्या स्वीकारल्याचे फडणवीस म्हणाले. नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण आपण केलं आहे. गडचिरोली जिल्हा खनिकर्म प्राधिकरण विधेयक मंजूर केलं आहे. मकोकात आता नार्को टिक्स घेण्याचे देखील ठरवले आहे. पुरवणी मागण्यांना मान्यता देण्यात आली असल्याचे फडणवीस म्हणाले.

राज्य सरकारनं दिव्यांगांसाठी आता अडीच हजार रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच शिक्षकांना देखील अनुदान दिले आहे. तसेच भूषण गवईचा यांचे देखील सत्कार आपण केला आहे. अनुकंपाची यादी समाप्त करण्याचा निर्णय मंत्रीमंडळाने घेतला आहे. संत सावता महाराज समाधी मंदिर विकासासाठी मान्यता देण्यात आली आहे. विरोधकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तरं देण्यात आली असल्याचे फडणवीस म्हणाले.

सत्तारुढ पक्ष म्हणून झालेल्या कामकाजावर आम्ही समाधानी असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. राज्याची पुढची वाटचाल कशी असणार याबाबतही चर्चा झाली. मात्र, हे खरे आहे की, काही गोष्टी अशा घडल्या की, त्या गोष्टीचं आम्हाला देखील दुःख आहे. अशा गोष्टी घडू नये म्हणून भविष्यात काळजी घेतली जाईल असे मुख्यमंत्री म्हणाले. विरोधकांनी कोणतेही पुरावे न देता आरोप केला. आरोप करायचे आणि त्यातून बाजूला व्हायचे ही विरोधकांची भूमिका होती असे फडणवीस म्हणाले.

## दिनो मोरियाने तोंड उघडलं तर अनेकांचा मोरया होईल

एकदा सभागृहात मुंबई आणि विकासकामांबाबत बोलताना नाव न घेता उद्धव ठाकरेंवर जोरदार हल्लाबोल केला. काही लोकांनी अर्धवट माहितीच्या आधारे मुद्दे मांडले, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत नाही, त्यामुळे काम होत नाही असं सांगण्यात आलं. मात्र राज्यघटना आपण मानतो आणि त्यानुसार काम करावे लागते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कोर्टात असल्याने घेता आल्या नाही. 'ओबीसी आरक्षण हेही महत्त्वाचं 'सर्वोच्च न्यायालयाने निवडणुका घेण्याचे आदेश दिले आहेत, त्यानुसार आहे.

ओबीसी आरआरक्षणाच्या शिवाय निवडणुका नको होत्या, मात्र आता कोर्टाने आदेश दिले आहेत असे म्हणत एकनाथ शिंदेनी सभागृहात जोरदार बॅटिंग केली. तसेच, मुंबई महापालिका आणि मराठीच्या मुद्यावरुन ठाकरे बंधूंना टोला लगावला. तसेच, मिठी नदीच्या गाळाचा मुद्दा उपस्थित करत दिनो मोरियाला हे कंत्राट का दिलं, असा सवाल एकनाथ शिंदेंनी उपस्थित केला.

निवडणूक झाली नसली तरी कोणतही काम थांबलेल नाही. मुंबईत बदल होत आहे, हे छातीवर हात ठेवून विजयराव सांगा. 'मुंबईकर आमच्यासाठी फर्स्ट आहेत आणि इतरांसाठी कंत्राटदार फर्स्ट आहेत. 'मी मुख्यमंत्री झाल्यानंतर पहिल्यांदाच चहल यांना बोलावले आणि खड्ड्यांच्या संदर्भात सांगतील आणि त्यानंतर दोन फेजमध्ये सर्व रस्ते करण्याचे आदेश दिले. 'पहिला फेज पूर्ण झाला आहे, आपण 'काँक्रीटीकरण करत आहोत, त्यामुळे मुंबई खड्डेमुक्त होईल. मुंबई आणि एमएमआर रिजन १.५ ट्रिलियन डॉलरची क्षमता आहे. आमच्यावर 'मुंबई तोडण्याचा आरोप होतोय पण आम्ही जोडणारे आहोत, असे एकनाथ शिंदेंनी म्हटले. मराठी माणसासाठी काय केलं असं म्हणत अनेकजण गळे काढतात, मात्र तो बाहेर का फेकला गेला याचं आत्मपरिक्षण करण्याची गरज आहे. कोणाच्या काळात हे बाहेर गेले, 'पत्राचाळीमध्ये कोणी माया गोळा केली? संक्रमण शिबिरात खुराड्यासारख ठेवण्यात आल ते मराठी माणस नाही का? असा सवाल एकनाथ शिंदेंनी उपस्थित केला. मुंबईतील रमाबाई नगरमध्ये भाडं दिल जात नव्हतं, मी स्वतः चेक वाटून आलो. 'सर्व प्रकल्प जेव्हीत करायचे असा निर्णय आम्ही घेतला. 'गिरणी कामगार यांच्या संदर्भात ही बैठक झाल. 'ज्यादा इन्सेटिंव देऊन त्यातून निर्माण होणारी घर गिरणी कामगारांना देणार आहोत. १ लाख लोकांचा आम्ही पहिल्यांदा सर्व्हे केला, 'किती पात्र लोक आहेत याची नोंद केल्याचे एकनाथ शिंदेंनी सांगितले.

मुंबईबाहेर फेकलेला मुंबईकर पुन्हा मुंबईत येईल, क्लस्टरच्या माध्यमातून आपण अनेक योजना आणत आहोत. कोळी वाड्याच्याबाबत देखील आपण निर्णय घेतलाय, बदल घडवण्याचे काम आपण करतोय. धारावी हा जगातला सर्वात मोठा प्रकल्प आहे, आपण धारावीच्या विकासासाठी जमीन देतोय. पूर्वीच्या सरकारने निर्णय फक्त पात्र लोकांसाठी घेतला होता. पण आम्ही पात्र आणि अपात्र लोकांसाठी निर्णय घेतला आहे. रेल्वेच्या जागेत प्लॅन सुरु झाला, असेही एकनाथ शिंदेंनी म्हटले.

## ज्येष्ठ लेखक पठारे सर यांच्या पंच्याहत्तरीनिमित्त विविध कार्यक्रम

कवी भरत दौंडकर, 'शब्दालय प्रकाशन'च्या सुमती लांडे आदी मान्यवरांची उप-स्थिती लाभणार आहे. कार्यक्रम साठी ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन निर्मलग्राम ग्रामपंचायत म्हस्केवाडी, श्री गणेश देवस्थान ट्रस्ट, सह्याद्री दे-वराई परिवार आणि समस्त ग्रामस्थ म्हस्केवाडी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

सोशल नेटवर्किंग फोरम आणि ग्रामपंचायत, निरगुडे यांच्या संयुक्त विद्यमाने कै. सौ. विजया जीवन सोनवणे यांच्या स्मरणार्थ निरगुडे, ता. पेठ येथे वाचनालय व डिजिटल शाळा साकार करण्यात येणार आहे. **यावेळी डॉ. सुभाष सोनवणे, प्रमोद गायकवाड, गोकुळ झिरवळ, रामदास शिंदे, उदयकुमार सोनवणे, श्रीमती ललितप्रभा पाटील, जीवन सोनवणे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहे.**

**देवीनंदा सुरेश खंबाईत, सुरेश खंबाईत, देवीदास राऊत, डी. व्ही. गायकवाड, डी. के. खंबाईत, विठोबा भोवे, विठू खंबाईत, किरण नाठे, इंद्रायणी गावंडे, हेमंत भामरे, हर्षल जीवन सोनवणे यांनी कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.**

## प्लॅस्टिक फुलांवर येणार बंदी!

**प्लॅस्टिक फुलांवर कायमस्वरूपी निर्बंध आणून फुलशेती करणाऱ्या शेतकऱ्यांना न्याय देणेसाठी बैठक आयोजित करणे गरजेचे असल्याचे निवेदनात नमूद केले आहे. दरम्यान रोहित पाटील यांनी प्लॅस्टिक फुलावर बंदी घालण्याच्या केलेल्या मागणीला विधिमंडळातील सत्ताधारी व विरोधी पक्षातील तब्बल १०५ आमदारांनी स्वाक्षरी देऊन पाठिंबा दर्शवला आहे. शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर पण त्याचबरोबर नागरिकांच्या आरोग्यावर व पर्यावरणावर प्लास्टिक फुलांमुळे गंभीर परिणाम होत आहे. ही महत्त्वाची बाब आमदार रोहित पाटील यांनी लक्षामध्ये आणून दिली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फलोत्पादन मंत्री भरत गोगावले व पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत या विषयावर तातडीने बैठक घेण्याचे आश्वस्त केले आहे.**

## कुंभमेळ्यापूर्वी शिर्डी विमानतळाची प्रस्तावित कामे पूर्ण करावी

**आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र दुडी, अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांड्ये, मुख्य वित्त अधिकारी अनिशा गोदानी आदी उपस्थित होते.**

**मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शिर्डीतील विमानतळावरील नवीन एटीसी इमारत, नवीन एकात्मिक मालवाहतूक इमारत, नवीन टर्मिनल इमारतीची कामे प्रस्तावित आहेत. ही कामे आगामी कुंभमेळा सुरू होण्यापूर्वी पूर्ण होणे आवश्यक आहे. मात्र ही कामे संथगतीने सुरू आहेत. ही कामे वेळेत पूर्ण होणे आवश्यक असून त्यासाठी आवश्यकवाटल्यासअतिरिक्तमनुष्यबळ वापरावे. तसेच विमानतळासाठी आवश्यक असणारी खरेदी व स्ट्रक्चरल डिझाईनची कामे येत्या आठवड्यात पूर्ण करावीत. शिर्डी विमानतळ हे मुंबई व नवी मुंबई विमानतळाच्या जवळचे विमानतळ आहे. येथील लहान विमाने पार्किंगसाठी शिर्डी विमानतळाचा वापर होऊ शकतो. त्यादृष्टीने आतापासूनच शिर्डी विमानतळावर सुविधा निर्माण करण्यासाठी आवश्यक असल्यास आणखी जमीन संपादीत करावी, असे निर्दे शही त्यांनी यावेळी दिले. उपमुख्यमंत्री पवार यांनी पुरंदर विमानतळाचे काम लवकर सुरू व्हावे, यासाठी तातडीने कार्यवाही करण्यात यावी. तसेच त्याठिकाणी मोठी विमाने उतरण्याची सोय असावी, त्यासाठी – आतापासूनच आवश्यक ती काळजी घ्यावी. या विमानतळावर विमानांच्या हँगरचीही व्यवस्था असावी, असे सांगितले. महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणाच्या उपाध्यक्ष पांड्ये यांनी सादरीकरणाद्वारे शिर्डी व पुरंदर विमानतळाच्या कामांची माहिती दिली.**

| | | |
|---|---|---|
| चिमण्या चिवचिवल्या | - मा.रा.लामखडे | रु. १०० |
| टिकली तर टिकली | - श्रद्धा बेलसरे | रु. १५० |
| रानसय | - भास्कर चंदनशीव | रु. २२५ |
| निःशब्द कोलाहल | - धनंजय गोवर्धने | रु. ११० |
| आधुनिक मराठी गेय कविता | - डॉ.सयाजीराजे मोकाशी | रु. १७५ |
| मुके जाते गाणे गाते | - विनायक बंगाळ | रु. ९० |
| कानडी मुलखातील मुशाफिरी (प्रवास वर्णन) | - मा.रा.लामखडे | रु. २२० |
| पैंजणांचे झाड | - सिसिलिया कार्व्हालो | रु. १५० |
| काळोखाला दूर सारून | - प्रतिभा जाधव | रु. १४० |
| साळुंकीची सावली | - महावीर जोंधळे | रु. १८० |
| उत्कर्षवाटा (पुणे विद्यापीठ) | - संपा.डॉ.लांडगे, डॉ.रोंगटे, डॉ.सांगळे | रु. १२० |
| रंग जीवनाचे | - बबन काकडे | रु. २५० |
| च्यामारी | - डॉ.प्रमोद काळे | रु. १८० |
| कुब्र | - सत्यजित पाटील | रु. २३० |
| **नाटक/एकांकिका/चित्रपट विषयक** | | |
| तुंबारा | - सयाजी शिंदे | रु. २५० |
| तृतीय रत्न (नाटक) (जळगाव विद्या. अभ्यासक्रमात समाविष्ट) | - ले.जोतिराव फुले, संपा. दत्ता भगत | रु. २२५ |
| माझं घर | - जयंत पवार | रु. १६० |
| जनक | - शार्दुल सराफ | रु. १५० |
| हंडाभर चांदण्या (संहिता आणि लेख) (पुणे विद्यापीठ) | - दत्ता पाटील/ संपा.सतिश बडवे | रु. १५० |
| राहिले दूर घर माझे | - शफाअत खान | रु. १४० |
| चौक | - मकरंद साठे | रु. १२० |
| मंथरक आणि इतर एकांकिका | - जयसिंग पाटील | रु. ९० |
| जाता नाही जात | - सिद्धार्थ तांबे | रु. १५० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| प्रत्ययकारी परदेशी सिनेमा | - उदय कुलकर्णी | रु. ६५० |
| **चरित्र/आत्मचरित्र** | | |
| श्री.संत चोखामेळा : चरित्र आणि अभंग | - संपा.स.भा.कदम, प्रस्ता.भालचंद्र नेमाडे | रु. १६० |
| जिजी (शेतकरी आईची जीवनगाथा) | - प्रा.सौ.लिला जंजिरे | रु. २०० |
| कोकरूड ते बर्मिंगहॅम | - प्रा.अब्दुलगनी अत्तार | रु. ३७५ |
| सुंबरान | - दिनकर यमनाजी शेलार | रु. २५० |
| पंख गळून गेले तरी | - सुधीर देवरे | रु. ८० |
| स्त्रीरत्न क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चोले | रु. ७५ |
| मलिक अंबर | - वि.स.वाकसकर | रु. १०० |
| लावणी सम्राज्ञी (यमुनाबाई वाईकर यांचे चरित्र) | - प्रभाकर ओव्हाळ | रु. २५० |
| कांताबाई सातारकर | - संतोष खेडलेकर | रु. २०० |
| स्वातंत्र्यसूर्य महाराणा प्रताप | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| संत मीराबाई | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| मी तो हमाल | - आप्पा कोरपे | रु. १५० |
| प्रकाशाची बेटे | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २२० |
| **कविता संग्रह** | | |
| बालकवींच्या निवडक कविता | - संपा.ना.धों.महानार | रु. ११५ |
| वसा | - वसंत सावंत | रु. ७५ |
| सुमती लांडे : समग्र कविता | - संपादक : कविता मुरुमकर/ सुमती लांडे | रु. ५९९ |
| कमळकाचा | - सुमती लांडे, चित्रप्रत्यय- प्रभाकर कोलते | रु. २०० |
| वाहते अंतर | - सुमती लांडे | रु. ९० |
| तुकाराम : अहिराणीत निरुपण | - डॉ.एस.के.पाटील | रु. ५२५ |
| बोलावे ते आम्ही (साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त) | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| येरू म्हणे | - प्रवीण बांदेकर | रु. १०० |
| बोलावे ते आम्ही | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| ऋतुपर्णाच्या कविता | - जितेंद्र कुंवर | रु. ३०० |
| आवानओल | - अजय कांडर | रु. १०० |
| प्रलयानंतरची तळटीप | - सुचिता खल्लाळ | रु. २२५ |
| दंडविधान | - मनोज सुरेंद्र पाठक | रु. २७० |
| एक शून्य प्रतिक्रिया | - व्यंकटेश चौधरी | रु. २०० |
| माणूस उकरून काढावा लागतोय | - सिसिलिया कार्व्हालो | रु. २०० |
| ज्याचा त्याचा चांदवा | - अंजली ढमाळ | रु. २२० |
| दुभंगवाणी | - डॉ.नंदू मुलमुले | रु. १५० |
| गरम झळा आणि संभ्रमाची फळे | - पोपट सातपुते | रु. १०० |
| भुईशास्त्र (साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त) | - ऐश्वर्य पाटेकर | रु. २२० |
| भुई तापाचे बळी | - प्रभाकर महाजन | रु. १६० |
| हिन्दोल | - संध्या शहापुरे | रु. २५० |
| अस्वस्थ क्षणांचे पाश | - समाधान महाजन | रु. १२० |
| विसविशीत जगण्याच्या उंबरठ्यावरून | - विलास माळी | रु. २०० |
| तहानलेले पाणी | - मारुती सावंत | रु. १२० |
| पाच बिघे | - लक्ष्मण बारहाते | रु. ८० |
| रक्तसेतू | - सुखदेव ढाणके | रु. १०० |
| हुर्दुक | - सुखदेव ढाणके | रु. ९० |
| ओले अथांग श्वास | - रामकली पावसकर | रु. १०० |

| | | |
|---|---|---|
| स्त्री कुसाच्या कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १२५ |
| कुणब्याची कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १३० |
| बळीचं जिणं | - दयाराम गिलाणकर | रु. १०० |
| कविता दिक्षेच्या | - महेंद्र भास्कर पाटील | रु. ८० |
| मेघवृष्टी | - जयराम खेडेकर | रु. १०० |
| विलग | - गणेश आत्माराम वसईकर | रु. ९० |
| वादळवाट | - वंदना महाजन | रु. १५० |
| जिवन नरहची आसामी कविता | - अनु.शोभा नाईक | रु. ७५ |
| ब्रम्हसोपान | - रेषा आकोटकर | रु. ९० |
| एक टुकडा आसमाँ का | - विश्वजीत तुळजापूकर | रु. ७५ |
| एका गोरज घडीला (O.P) | - अरुण सांगोळे | रु. ७५ |
| नांगरून पडलेलं शतक | - रमेश चिल्ले | रु. ८० |
| अनुकार | - जयश्री पाठक | रु. ९० |
| खानदानी | भगवान देशमुख | रु. ८० |
| जगण्याच्या कोलाहलात | - गणेश मरकड | रु. २०० |
| आयडियल स्टेटच्या हद्दीबाहेरून | - सिद्धार्थ तांबे | रु. ७० |
| ओळींनी अंबर व्हावे | - रमेश मगरे | रु. ११० |
| निरिच्छ नभ | - विनायक त्र्यं.पाटील | रु. ७० |
| रूप-अरूपाचे | - अशोक सोनवणे | रु. १०० |
| भोग सरू दे उन्हाचा | - कैलास दौंड | रु. ९० |
| इंद्रधनूच्या कमानीवर | - राजेश जाधव | रु. १०० |
| अक्षरऋतू | - प्रमोद जोशी | रु. १०० |
| रानभरारी | - गुंफा कोकाटे | रु. ८० |
| पाऊल खुणा | - संजीव दुधाट | रु. ८० |
| बाणगंगेच्या तिरी | - डॉ.मधुकर कवडे | रु. ९० |
| जन्मांतर | - शुभम अनिल दुरगुडे | रु. १२० |
| निवडक कविता | - संपा.प्रा.डॉ.वसंत शेकडे | रु. १०० |
| फिर्याद | - हिरा बनसोडे | रु. १०० |
| दाहगाथा | - कैलास सलादे | रु. १२० |
| अकुतोभय | - निलेश शेळके | रु. १४० |
| संदर्भासहित स्पष्टीकरण | - इरावती इंगवले-यादव | रु. १२० |
| सूर्य गेला नाही अजून अस्ताला | - विनायक हिरवे | रु. १५० |
| जखमी पावलांचे ठसे | - कैलास जिजाबाई चावडे | रु. १२० |
| केकतीची फुले | - ल.सि.जाधव | रु. १०० |
| काव्यबंध (मुंबई विद्यापीठ) | - संपा.डॉ.नीलकंठ शेरे/डॉ. नानासाहेब यादव/ डॉ.जगदिश राणे | रु. २०० |
| मी मातीचे फूल | - मीनल येवले | रु. २०० |
| ऐन पस्तिशीत | - दिलीप वीरखेडे | रु. ८० |
| काव्यभान | - रविंद्र कांबळे | रु. १०० |
| धुनी (O.P) | - सुरेश सावंत | रु. २०० |
| काहीच नष्ट होत नसतं | - विजय चोरमारे | रु. १६० |
| गाव हाकेच्या अंतरावर (O.P) | - जगदीश कदम | रु. १२० |
| माणूसनामा | - कैलास पगारे | रु. १२० |
| साकल्याच्या प्रदेशात | - डॉ.सिसिलिया कार्व्हालो, डॉ.धनाजी गुरव, डॉ.निलकंठ शेरे | रु. १५० |
| अधांतर अंधारात | - महेश केळुसकर | रु. २२० |
| आत्मपीठ | - मंदाकिनी पाटील | रु. २६० |
| पद्म गोपाळ | - सौ.निर्मला काळे | रु. ३०० |
| काव्यरंग | - डॉ.आरेकर, डॉ.यादव, डॉ.राणे | रु. २२० |
| हंबरवाटा | - संतोष आळंजकर | रु. २५० |
| दंडविधान | - मनोज पाठक | रु. २७० |
| कथार्सिस | - सारिका उबाळे | रु. ३४० |
| **चरित्र** | | |
| संत गाडगेबाबा | - विजय पाटील | रु. ३० |
| बहिणाबाई चौधरी | - मृण्मयी पाटील | रु. ३० |
| अहिल्याबाई होळकर | - विजया पाटील | रु. ३० |
| स्त्रीरत्न सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चौले | रु. ७५ |
| अहिल्याबाई होळकर | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| बहिणाबाई चौधरी : चरित्र आणि निवडक कविता | - सुमती पाटील | रु. ५० |
| डॉ.अब्दुल कलाम : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| इंदिरा गांधी : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| पंडित जवाहरलाल नेहरु : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| महात्मा ज्योतिबा फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| राष्ट्रपिता महात्मा गांधी | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| सावित्रीबाई फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| सम्राट अशोक : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| शाहू महाराज : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| जे.आर.डी.टाटा | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| यशस्वी भारतीय महिला (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| झाशीची राणी : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. १०० |
| पंडित दीनदयाळ उपाध्याय | - सुमती पाटील | रु. ५० |

| | | |
|---|---|---|
| **सामान्यज्ञान** | | |
| आधुनिक बेकरी व्यवसाय तंत्रज्ञान | - यू.डी.चव्हाण | रु. १००० |
| **शैक्षणिक/बाल/कुमार/प्रौढ साक्षर/इत्यादी** | | |
| निसर्गाकडे चला | - डॉ.गजानन पाटील | रु. १४० |
| तंत्र तणावमुक्तीचे | - डॉ.गजानन पाटील | रु. ४० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग १ | - डॉ.गजानन पाटील | रु. ६० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग २ | - डॉ.गजानन पाटील | रु. १२५ |
| मानसिक तणावमुक्त अध्यापन प्रतिमान (O.P) | - डॉ.गजानन पाटील | रु. १०० |
| पर्यावरण प्रकल्प कार्य (O.P) | - डॉ.तरुजा भोसले | रु. २५० |
| शालेय ग्रंथालय व्यवस्थापन | - डॉ.सी.श्री.पाटील | रु. १५० |
| शब्दसंपदा : निवडक भाषणे | - डॉ.भगवान सावंत | रु. ८० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| आठवणी यदुनाथांच्या | - संपा.डॉ.प.शं.झेंडे | रु. ७० |
| योगासनांची ओळख | - डॉ.प.शं.झेंडे | रु. ४५ |
| अध्यात्म, विज्ञान व संस्कार मूल्य | - दत्तात्रय चिताळकर | रु. १०० |
| गीतइसापनीती | - उषा परब | रु. ८० |
| करामती प्रकाश | - विजय नांगरे | रु. ५० |
| ओंजळीतील मोती | - प्रमिला हनुमंतराव रासकर | रु. १२० |
| एड्स | - विजया पाटील | रु. १५ |
| चिकुनगुणिया | - डॉ.एस.के.पाटील | रु. १५ |
| नखे कापा - निरोगी राहा | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. ३५ |
| खानदेशी गाव | - आबा महाजन | रु. १८० |
| नखपुराण | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. १५ |
| परोपकारी शंकर | - विजय नांगरे | रु. १५ |
| बहुगुणी तुळस | - डॉ.मंगला काजळे | रु. १५ |
| आपला नांदेड जिल्हा | - सुमती पाटील | रु. ३० |
| मालगुंडचा सिद्धू | - आनंद वाघ | रु. ३०० |
| बालसंस्कार | - ताई पवार | रु. १०० |
| आम्ही भी घडणार | - ताई पवार | रु. ११५ |
| विज्ञान कोडे | - ताई पवार | रु. १२० |
| दिशा नवोपक्रमाची | - ताई पवार | रु. १४० |
| श्री गणेशा शिक्षणाचा | - ताई पवार | रु. ९० |
| छत्रपती शिवाजी राजेभोसले यांचा पवाडा | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १०० |
| गुलामगिरी | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| शेतकऱ्याचा असूड | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| योग - सर्वांसाठी | - आनंद वाघ | रु. २५० |
| योगा - खेळ, छंद आणि संस्कार | - आनंद वाघ | रु. २५० |
| कोवीड १९ - अकल्पीत चकवा | - आनंद वाघ | रु. २०० |
| स्त्री - पुरुष तुलना | - ताराबाई शिंदे - संपा.महेंद्र मुंजाळ | रु. १२५ |
| महाराष्ट्रातील समाजसुधारक | - अे. देशमुख | रु. ८० |
| **कृषि विषयक पुस्तके** | | |
| **डॉ. यू. डी. चव्हाण / डॉ. पी. जी. पाटील** | | |
| मधुमक्षिका पालन - आळींबी लागवड (शेतीतील जोडधंदे) | | रु. ७२० |
| पेपेन उद्योग - रेशीम उद्योग (शेतीतील जोडधंदे) | | रु. ७०० |
| कुक्कुट पालन-ससे पालन (शेतीतील जोडधंदे) | | रु. ७०० |
| शेळी पालन - मेंढी पालन (शेतीतील जोडधंदे) | | रु. ७१० |
| पशुपालन व दुग्धव्यवसाय - गांडुळ खत निर्मिती प्रकल्प | | रु. ७०० |
| वराह पालन - मत्स्य उद्योग (शेतीतील जोडधंदे) | | रु. ७०० |
| महिलांना करता येण्यासारखे उद्योग (शेतीतील जोडधंदे) | | रु. ६९० |
| कृषि अवजारे व यंत्राचा उपयोग (शेतीतील जोडधंदे) | | रु. २६० |
| मसाला प्रक्रिया उद्योग | | रु. ५७० |
| मत्स्य प्रक्रिया उद्योग | | रु. ७०० |
| आंबा-केळी-द्राक्ष प्रक्रिया उद्योग | | रु. ६५० |
| अननस-चिकू-पेरु प्रक्रिया उद्योग | | रु. ६३० |
| अंजिर-चिंच-जांभूळ-पपई-स्ट्रॉबेरी प्रक्रिया उद्योग | | रु. ६५० |
| आवळा-डाळींब-बोर-प्रक्रिया उद्योग | | रु. ६५० |
| दूध व दुग्धजन्य पदार्थ | | रु. ६५० |
| फळभाज्या प्रक्रिया उद्योग | | रु. ६४० |
| काजू-कवठ-फालसा-कृष्णफळ-करवंद-सफरचंद-कोकम-फणस-उंबर-लिची प्रक्रिया उद्योग | | रु. ६५० |
| लिंबूवर्गीय फळे प्रक्रिया उद्योग | | रु. ६३० |
| मांस-मटन-अंडी प्रक्रिया उद्योग | | रु. ६५० |
| टोमॅटो-बटाटा-कांदा-लसून-प्रक्रिया उद्योग | | रु. ६१० |
| तृणधान्य-कडधान्य-गळीतधान्य प्रक्रिया उद्योग | | रु. ७१० |
| वाईन उद्योग | | रु. ७५० |
| कृषि क्षेत्रातील कृषि उद्योग | | रु. ५५० |
| कृषि प्रक्रिया उद्योग कोश | | रु. २००० |
| अक्षय उर्जा | | रु. १७० |

**शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर यांची महत्त्वाची पुस्तके मागविण्यासाठी खालील नंबरवर संपर्क करा – मो. ९०११२०१४१४ / ९८२२५२५४४४**

CMS
CREATIK
MULTI SERVICES PVT LTD



Discover Pustakvari : The Ultimate eBook Platform
State-of-the-Art eBook Readers
Advanced Security and Technology
Intelligent Search and Realistic Viewing Experience
Expansive Content Library
Global Accessibility and Multi-Publisher Platform
Tailored Solutions for Institutes and Libraries
Interactive Learning with General Knowledge Software
Smart Recommendations and User Customization

Contact US
Email : creatikpvtltd44@gmail.com
Contact : +91 22 3599 9192 | +91 9822525444
Website : creatikmultiservices.com

Gut No. 125, Ranjankhol, Tal. Rahata, Dist. Ahmednagar 413709

### भारतात बनवला जातोय जगातील पहिला

# ड्युअल स्टेल्थ ड्रोन : रडार, इन्फ्रारेड सिग्नलपासून बचावास सक्षम

**नवी दिल्ली** : भारत जगातील पहिला ड्युअल स्टेल्थ ड्रोन बनवत आहे, जो केवळ शत्रूच्या हाय-रेझोल्यूशन रडार आणि इन्फ्रारेड सिग्नलपासून बचाव करणार नाही, तर काही सेकंदात हल्ला करण्यास देखील सक्षम असेल. या ड्रोनचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे 'रडार ॲब्सॉर्प्शन अँड मल्टीस्पेक्ट्रल ॲडॉप्टिव्ह' तंत्रज्ञान.

हे एक विशेष स्वदेशी कोटिंग मटेरियल आहे, जे रडार आणि इन्फ्रारेड डिटेक्शन ९७% कमी करते. यामुळे ड्रोन शत्रूच्या रडार आणि इन्फ्रारेड सिग्नलपासून पूर्णपणे लपू शकतो. सध्या, फक्त अमेरिका, चीन आणि रशियाकडेच रडारपासून लपणारे स्टेल्थ ड्रोन आहेत.

या वर्षाच्या अखेरीस नौदलाकडे ड्रोन सुपूर्द केले जाऊ शकतात. या तंत्रज्ञानावर आधारित ड्रोनला असे नावही देण्यात आले आहे. या ड्रोनचे वजन १०० किलो आहे आणि ते ५० किलोपर्यंत वजन वाहून नेऊ शकते. रामासह हे ड्रोन २०२५ च्या अखेरीस नौदलाकडे सोपवले जाऊ शकते.

संरक्षण मंत्रालयाच्या मदतीने हैदराबादस्थित स्टार्टअप कंपनी वीरा डायनॅमिक्स आणि बिनफोर्ड रिसर्च लॅब हे ड्रोन विकसित करत आहे. ड्रोन तयार करण्यासाठी वीरा डायनॅमिक्सने त्यांचे वापरले आहे आणि बिनफोर्ड लॅब्सने त्यांचे स्वायत्त ड्रोन तंत्रज्ञान त्यात समाविष्ट केले आहे.



ही कल्पना कुठून आली?

वीरा डायनॅमिक्सच्या सीईओ साई तेजा पेद्दिनेनी म्हणाल्या की, २०२२ मध्ये नौदलाच्या समस्या विधानाने हा प्रकल्प सुरू झाला. नौदलाला असे तंत्रज्ञान हवे होते जे इन्फ्रारेड स्टेल्थ प्रदान करू शकेल, म्हणजेच ड्रोनला थर्मल सेन्सर्सपासून संरक्षण देऊ शकेल. येथूनच RAMA चा जन्म झाला.

वीराने बिनफोर्ड लॅब्सशी हातमिळवणी केली आहे, जी आधीच भारतीय सैन्यासाठी स्वायत्त ड्रोन बनवते. बिनफोर्डचे ड्रोन जीपीएस आणि रेडिओ फ्रिक्वेन्सी (आरएफ) मुक्त वातावरणात देखील ऑपरेट करू शकतात.

या ड्रोनमध्ये काय खास आहे?

रडार आणि इन्फ्रारेडही त्याला पकडू शकत नाही: रडार ॲब्सॉर्प्शन आणि मल्टीस्पेक्ट्रल ॲडॉप्टिव्ह कोटिंगमुळे, हे ड्रोन शत्रूच्या रडार आणि थर्मल सेन्सर्सना चकमा देऊ शकते.

उच्च-जोखीम मोहिमांसाठी डिझाइन केलेले: हे ड्रोन हेरगिरी, लक्ष्यित हल्ले किंवा पाळत ठेवणे यासारख्या उच्च-जोखीम असलेल्या भागात गुप्त ऑपरेशन्ससाठी डिझाइन केलेले आहे.

ड्रोन कसे काम करते?

या ड्रोनचे सर्वात मोठे शस्त्र म्हणजे त्याचे 'अदृश्य' असण्याची गुणवत्ता. ठअचअ मटेरियल दोन प्रकारच्या कार्बन मटेरियलपासून बनलेले आहे. हे एक विशेष नॅनोटेक आधारित स्टेल्थ कोटिंग आहे, जे रडार आणि इन्फ्रारेड स्पेक्ट्रममध्ये दृश्यमानता कमी करते. ते ड्रोनवर रंग किंवा आवरणाच्या स्वरूपात लावले जाते. हे कोटिंग रडार लाटा शोषून घेते आणि त्यांचे उष्णतेत रूपांतर करते. ही उष्णता इतक्या लवकर हवेत विरघळते की ड्रोनचे थर्मल सिग्नेचर जवळजवळ नाहीसे होते.

---

### तुम्ही लोकसभेत कमावलं

## ते विधानसभेला गमावलं

**मुंबई** : केंद्रीय निवडणूक आयोगावर ठाकरे गटाचे प्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी हल्लाबोल केला. सामनाच्या महामुलाखतीत उद्धव ठाकरेंनी आयोगावर टीका केलीय. निवडणूक आयोग म्हणजे शेंदूर फासलेला धोंड्या आहे असं उद्धव ठाकरे म्हणाले. शिवसेना नाव, चिन्हं इतरांना देण्याचा धोंड्याला अधिकार नाही अशी घणाघाती टीका त्यांनी केली. तसंच देश अशांत, अस्थिर ठेवायचा हेच भाजपचं धोरण आहे, पंतप्रधान नरेंद्र मोदींची ७५ वर्षे भरत असल्याचा इशारा सरसंघचालकांनी दिलाय, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

लोकसभेचा आणि विधानसभेच्या निवडणुकीच्या निकालावर देखील भाष्य केलं आहे. जे तुम्ही लोकसभेला कमावलंत, ते विधानसभेला गमावलंत. फक्त सहा महिन्यांत हे कसं घडलं?, असा प्रश्न संजय राऊतांनी उद्धव ठाकरेंना विचारला. यावर विधानसभेच्या वेळी शेवटच्या दिवसापर्यंत खेचाखेच सुरू राहिली. 'तू तू मैं मैं' झालं. त्याचा चुकीचा मेसेज लोकांमध्ये गेला, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

---

## मुंबई के समंदर में डुबे डुबे कर मारेंगे : राज ठाकरे

**मुंबई** : भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांनी ठाकरे बंधूंना आव्हान दिलं होतं. आपल्या घरात कोणीही सिंह असतो. तुमच्यात हिंमत असेल तर बिहार, तामिळनाडू, उत्तरप्रदेशात या, तुम्हाला दाखवून देऊ...महाराष्ट्र बाहेर या, तुम्हाला आपटून आपटून मारु, असं निशिकांत दुबे म्हणाले होते. निशिकांत दुबेंच्या या विधानावरुन राज ठाकरेंनी देखील प्रतिआव्हान दिलं आहे.

तू आम्हाला पटक पटकके मारणार? दुबेला मी सांगतो...दुबे..तुम मुंबई में आ जावो...मुंबई के समंदर में डुबे डुबे कर मारेंगे..., असं म्हणत राज ठाकरे यांनी भाजप खासदार निशिकांत दुबे यांना प्रत्युत्तर दिलं.

---

### भारत-पाकिस्तान युद्धात

## ५ विमाने पाडण्यात आली : ट्रम्प

**नवी दिल्ली** : पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूर राबवत चोख प्रत्युत्तर दिले होते. या हल्ल्यानंतर सुरू झालेल्या भारत-पाकिस्तान युद्धात पाच विमाने पाडण्यात आली होती, असा दावा अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. व्हाईट हाऊसमध्ये काही रिपब्लिकन अमेरिकन कायदेकर्त्यांसोबत डिनरमध्ये बोलताना ट्रम्प यांनी हे विधान केले. त्यांनी कोणत्या बाजूच्या विमानांचा उल्लेख केला हे स्पष्ट केले नाही.

डोनाल्ड ट्रम्प म्हणाले की, विमानांवर हवेतून गोळीबार करण्यात येत होता. पाच, पाच, चार किंवा पाच, परंतु मला वाटते की प्रत्यक्षात पाच विमाने पाडण्यात आली होती, असे ट्रम्प यांनी युद्धाबद्दल बोलताना सांगितले, परंतु अधिक तपशीलवार माहिती दिली नाही. वॉशिंग्टनने दोन्ही बाजूंशी चर्चा केल्यानंतर १० मे रोजी सोशल मीडियावर जाहीर केलेल्या भारत आणि पाकिस्तानमधील युद्धबंदीचे श्रेय ट्रम्प यांनी वारंवार घेतले आहे. ट्रम्प यांच्या हस्तक्षेपामुळे आणि व्यापार चर्चा तोडण्याच्या धमक्यांमुळे हे घडले या दाव्यांशी भारताचे मतभेद आहेत.

---


**महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांच्या पत्रानुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्यातर्फे निवडण्यात आलेली नगरपालिका व जिल्हापरिषद शाळेंसाठी निवडक वाचनीय पुस्तकांची यांदी**

| अ.नं. | पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|---|
| १ | गोष्ट कॉम्प्युटरची | संदीप लांडे | 100 |
| २ | जलऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| ३ | अंतराळ- २ | संदीप लांडे | 150 |
| ४ | रोमांचकारी सफर | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ५ | पेरणी | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ६ | हिऱ्यांची पिशवी | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ७ | करामती प्रकाश | विजय नागरे | 150 |
| ८ | अद्भुताचा शोध | विजय नागरे | 130 |
| ९ | जग बदलणारे ५० शोध | आनंद वाघ | 120 |
| १० | घाबरलेल्या सुषमाची गोष्ट | सुमति लांडे | 130 |
| ११ | प्राणी गायब होऊ लागले | आबा गोविंदा महाजन | 150 |
| १२ | बोधकथा | मृण्मयी पाटील | 100 |
| १३ | संवेदना आणि इतर कथा | बाळ पोतदार | 110 |
| १४ | पीठाचा माठ | संतोष खेडलेकर | 100 |
| १५ | आनंदी गाणी | स्नेहा पाटील | 100 |
| १६ | मुलांसाठी शोर्यकथा | संतोष खेडलेकर | 110 |
| १७ | बिल्लू | श्यामला एस. | 100 |
| १८ | करामती मुंग्या | संज्योत बनूबकोडे | 100 |
| १९ | जलधारा | मृण्मयी पाटील | 100 |
| २० | अशी मोडली खोड | मृण्मयी पाटील | 100 |
| २१ | निसर्ग माझा सवंगडी | संदीप लांडे | 100 |
| २२ | पवन ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २३ | निसर्गाचे संवर्धन का करावे | संदीप लांडे | 200 |
| २४ | सौर ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २५ | शाळा सवंगडी | विजय नागरे | 130 |
| २६ | आमची शाळा | विजय नागरे | 130 |
| २७ | कौशल्य | विजय नागरे | 100 |
| २८ | इवलासा ससा | संज्योत बनूबकोडे | 100 |
| २९ | स्वातंत्र्यसंग्रामाच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ३० | पिंकू आणि सोनू | श्यामला एस. | 100 |
| ३१ | महानायक | संतोष खेडलेकर | 100 |
| ३२ | संस्कार कथामाला | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३३ | देण्याचा आनंद | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३४ | सफर जगातल्या आश्चर्याची | संतोष खेडलेकर | 120 |
| ३५ | किलबिल गोष्टी | नामदेव माळी | 150 |
| ३६ | हिम्मत | विजय नागरे | 150 |
| ३७ | बी ची गोष्ट | सुनील भोडगे | 100 |
| ३८ | दोरीची करामत | विजय नांगरे | 100 |
| ३९ | ऐतिहासिक शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 130 |
| ४० | चांगला मित्र | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ४१ | सईचे पंख | विजय नागरे | 150 |
| ४२ | मी अब्दुल कलाम | मृण्मयी पाटील | 100 |
| ४३ | पाण्याविषयी सर्वकाही | संदीप लांडे | 100 |
| ४४ | नाच रे मोरा | सूचित पाटील | 100 |
| ४५ | कावळा काळा कसा झाला | श्यामला एस. | 100 |
| ४६ | रोबोट माझा मित्र | विशाल तायडे | 160 |
| ४७ | उद्धट नंदू | श्यामला एस. | 100 |
| ४८ | झाडाची गोष्ट | शाल्मल लांडे | 100 |
| ४९ | चला पावसाच्या पाण्याची बचत करू | संदीप लांडे | 130 |
| ५० | कचरा व्यवस्थापन | संदीप लांडे | 200 |
| ५१ | हुशार बकरी | बाळ पोतदार | 100 |
| ५२ | आपले हरित घर | संदीप लांडे | 100 |
| ५३ | आपली हरित शाळा | संदीप लांडे | 100 |
| ५४ | मालगुंडचा सिद्धू | आनंद वाघ | 100 |
| ५५ | अद्भुत पोषोख | विजय नांगरे | 160 |
| ५६ | सातपुड्याच्या जंगलामध्ये | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ५७ | रणरागिणींच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ५८ | बबलू खरेदीला जातो | श्यामला एस. | 100 |
| ५९ | चिंटू नावाचा कोल्हा | श्यामला एस. | 100 |
| ६० | दोन जादूगार | रमेश महाले | 100 |
| ६१ | हरवलेला धबधबा | श्यामला एस. | 100 |
| ६२ | चतुर कोल्हा वेंधळा बोकड | मृण्मयी पाटील | 100 |
| ६३ | दिनेशची समुद्र किनाऱ्यावरील सफर | श्यामला एस. | 100 |
| ६४ | प्राणीसृष्टी भाग-१ | रमेश महाले | 200 |
| ६५ | कागा आणि नारळ | श्यामला एस. | 100 |
| ६६ | दिशा नवोपक्रमाची | ताई पवार | 160 |
| ६७ | नशिबाची साथ | विजय नागरे | 100 |
| ६८ | वृक्षगान | लैला महाजन | 100 |
| ६९ | वृक्षवल्ली आम्हा सोयरे | लीलावती भागवत | 100 |
| ७० | म्हणींचा शोध मनास बोध | म.ना. जोशी | 100 |
| ७१ | एकमेका सहाय्य करू | म.ना. जोशी | 100 |
| ७२ | राजा पिल्लाची गोष्ट | लीलावती भागवत | 100 |
| ७३ | छान छान गोष्टी | रोहिणी कुलकर्णी | 100 |
| ७४ | बछडा | मुकुंद निगवेकर | 100 |
| ७५ | संस्कार गोष्टी | म.ना. जोशी | 100 |
| ७६ | सुबोध कथा | मीरा जाधव | 100 |
| ७७ | उपेक्षित बालके | म.ना. जोशी | 100 |
| ७८ | चोरीची माया | बबन खंडगळे | 100 |
| ७९ | गोष्ट राम्पुरीची | बबन खंडगळे | 100 |
| ८० | टीमटीमणारे तारे | स्नेहलता बावळे | 100 |
| ८१ | १११ बोधकथा | हेमंत गोखले | 100 |
| ८२ | सृष्टीशी जडवू नाते | लीलावती भागवत | 100 |
| ८३ | आदर्श गोष्टी | शोभा जोशी | 100 |
| ८४ | अशीही दिवाळी | वर्षा गडकर | 100 |
| ८५ | स्वप्नाचा पाठपुरावा | वर्षा गडकर | 100 |
| ८६ | म्हणीच्या बोधकथा | म.ना. जोशी | 100 |
| ८७ | मजेदार मज्जा | स्नेहलता बावळे | 100 |
| ८८ | व्यंगावर मात | वर्षा गडकर | 100 |
| ८९ | धाडसी आजी | वर्षा गडकर | 100 |
| ९० | आपले पक्षी-सखे सोबती भाग १ | मंगेश कश्यप | 100 |
| ९१ | आपले पक्षी-सखे सोबती भाग २ | मंगेश कश्यप | 100 |
| ९२ | आपले पक्षी-सखे सोबती भाग ३ | मंगेश कश्यप | 100 |
| ९३ | छोट्यांसाठी मोठ्या गोष्टी | वर्षा गडकर | 100 |
| ९४ | सुसंस्कारीत मनोबल | शोभा जोशी | 100 |
| ९५ | मुल नव्हे देवदूतच | नीला कदम | 100 |
| ९६ | वसा स्वावलंबनाचा | शोभा जोशी | 100 |
| ९७ | गुडबाय छोट्या मित्रा आणि इतर गोष्टी | विनया साठे | 100 |
| ९८ | एक झाड लावू मित्रा | अनंत भावे | 100 |
| ९९ | गोष्टीरूप चाणक्य | राजेंद्र खरे | 150 |
| १०० | माणुसकीचा श्वास | नीला कदम | 100 |
| १०१ | पोषक गोष्टी भाग १ | शोभा जोशी | 100 |
| १०२ | पोषक गोष्टी भाग २ | शोभा जोशी | 100 |
| १०३ | विचार यशाचाच | वर्षा गडकर | 100 |
| १०४ | खरी कमाई | शोभा जोशी | 100 |
| १०५ | नातं | वर्षा गडकर | 100 |
| १०६ | बाल रक्षक कायद्याचे | अविनाश भोंडवे | 100 |

**वरील पुस्तके मागविण्यासाठी समोरील नंबरवर संपर्क करा - मो. ९०११२०१४१४/९८२२५२५४४४**


---

## वेस्ट इंडिज संघ घालणार सोन्याने मढवलेली जर्सी!




**मुंबई** : क्रिस गेल, डीजे ब्रावो, किरोन पोलार्ड यांसारख्या वेस्ट इंडिजच्या दिग्गजांनी सजलेला 'वेस्ट इंडिज चॅम्पियन्स' संघ यंदाच्या वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लिजेंड्स (थउङ २०२५) मध्ये इतिहास घडवणार आहे. कारण, या संघाने क्रिकेट इतिहासातील सर्वात महागडी आणि खास जर्सी सादर केली आहे. विशेष म्हणजे या जर्सीमध्ये १८ कॅरेट सोन्याचा वापर करण्यात आला आहे.

वेस्ट इंडिज चॅम्पियन्सची ही जर्सी फक्त देखाव्यासाठी नाही, तर त्यामागे वेस्ट इंडिज क्रिकेटच्या महान परंपरेला मानाचा मुजरा करण्याचा उद्देश आहे. या जर्सीचे वजन वेगवेगळ्या व्हर्जनमध्ये आहे. ३० ग्रॅम, २० ग्रॅम आणि १० ग्रॅम अशा वेगवेगळे व्हर्जनची जर्सी आहे. सर क्लाइव्ह लॉयड पासून ते क्रिस गेलपर्यंत वेस्ट इंडिजच्या दिग्गजांना ही एक आगळीवेगळा सलाम ठरणार आहे.

वेस्ट इंडिज चॅम्पियन्स संघाचे चेअरमन अजय सेठी म्हणाले, ''आमच्या संघात दिग्गज खेळाडू आहेत. ही जर्सी वेस्ट इंडिज क्रिकेटच्या महान खेळाडूंना समर्पित आहे. डब्ल्यूसीएल हा जगातील सर्वोत्तम क्रिकेट टूर्नामेंट्सपैकी एक आहे. यंदा आमचा हेतू ट्रॉफी जिंकण्याचा आहे.''

वेस्ट इंडिज चॅम्पियन्सचा संघ

क्रिस गेल (कर्णधार), किरोन पोलार्ड, ड्वेन ब्रावो, लेंडल सिमन्स, ड्वेन स्मिथ, शेल्डन कॉटरेल, शिवनारायण चंद्रपॉल, चाडविक वॉल्टन, शॅनन गॅब्रिएल, ॲशली नर्स, फिडेल एडवर्ड्स, विलियम पर्किन्स, सुलेमान बेन, डेव मोहम्मद, निकिता मिलर

कोणकोणते दिग्गज खेळणार?

या स्पर्धेत क्रिकेटचे दिग्गज पुन्हा एकदा मैदानावर बॅट-बॉल हातात घेऊन उतरतील. युवराज सिंग, हरभजन सिंग, शिखर धवन, सुरेश रैना, ब्रेट ली, क्रिस लिन, शॉन मार्श, इयॉन मॉर्गन, मोईन अली, सर ॲलेस्टेअर कुक, एबी डिव्हिलियर्स, हाशिम आमला, क्रिस मॉरिस आणि वेन पार्नेल यांसारखे खेळाडू यंदाच्या स्पर्धेत दिसणार आहेत.

सामना कुठे पाहाल?

ही स्पर्धा १८ जुलै ते २ ऑगस्ट दरम्यान इंग्लंडच्या बर्मिंगहॅम, नॉर्थहॅम्पटन, लीसेस्टर आणि लीड्स येथे होणार आहे. इंग्लंड ॲण्ड वेल्स क्रिकेट बोर्डाने (एउइ) या स्पर्धेला अधिकृत मान्यता दिली आहे. भारतातील प्रेक्षकांना हे सर्व सामने स्टार स्पोर्ट्स आणि फॅन कोडवर रोज सायंकाळी ५ आणि रात्री ९ वाजता (डबल हेडर) थेट पाहता येतील.

साप्ताहिक शब्दरुतू - हे पत्र मालक, प्रकाशक सुमती साईनाथ लांडे यांना मुद्रक विजय दत्तात्रय नगरकर यांनी आदित्य प्रिंटर्स, कामगार सदन, क्रॉस मेनरोड, श्रीरामपूर-४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून शब्दालय प्रकाशन, पोस्ट बॉक्स नं.९०, वार्ड नं.७, आयडीया टॉवरजवळ, श्रीरामपूर ४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक- सुमती साईनाथ लांडे
Total Code - SR.NO./MAG/11/2021